# मुंबईसाठी ८१३ कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा

## शहर बांगलादेशीमुक्त करण्याचा उपमुख्यमंत्र्यांचा निर्धार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** येत्या काळात मुंबई बांगलादेशी घुसखोर आणि अमली पदार्थमुक्त करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला असून त्यासाठीचा कृती आराखडाही तयार करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिली. बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर माध्यमांशी शिंदे बोलत होते. या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी वाढीव मागणीसह ८१३ कोटी ३५ लाख ७२ हजार रकमेच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ७८५.३५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २८ कोटी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांसाठी ७२ हजार इतक्या रकमेचा समावेश आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून होणारी विकासकामे विहित कालमर्यादेत, गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करावीत. यासाठी कार्यान्वयीन यंत्रणांनी, टीम वर्कने मंजूर निधी विहित कालावधीत १०० टक्के खर्च करावा, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या. तसेच ज्या यंत्रणा त्यांचा मंजूर निधी व कामे विहित कालावधीत पूर्ण करणार नाहीत अशा यंत्रणांच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी या वेळी दिला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार सचिन अहिर, सुनील शिंदे, प्रसाद लाड, मनीषा कायंदे, चित्रा वाघ, अजय चौधरी, अमीन पटेल, महेश सावंत, मनोज जामसुतकर, शिवाजीराव गर्जे, जगन्नाथ अभ्यंकर, ज्योती गायकवाड, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, जिल्हाधिकारी आंचल गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय भोपळे आदी उपस्थित होते.

### शहराच्या विकासासाठी सूचना...

- शहरातील उद्यानांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी आणि शौचालय व्यवस्था करण्यात यावी.
- भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी कायमस्वरूपी डॉग शेल्टर करण्यासाठी महापालिकेने जागा निश्चित करावी.
- शहरात रहदारीच्या ठिकाणी नागरिकांना कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये यासाठी अशा ठिकाणांची महापालिकेने तपासणी करून त्या ठिकाणांचे अनधिकृत स्टॉल काढण्याची कार्यवाही करावी.
- बाजारपेठेमध्ये नागरिकांची विशेषतः महिलांची गैरसोय होऊ नये, यासाठी अशा ठिकाणी फिरत्या शौचालयाची व्यवस्था निर्माण करावी.
- महापालिकेच्या रुग्णालयांत दिल्या जात असलेल्या आरोग्य सेवेत ज्या आजारावरील उपचार महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समाविष्ट नाहीत असे आजार योजनेत समाविष्ट करण्यासाठी महापालिकेने सरकारला प्रस्ताव सादर करावा.

> मुंबईला अमली पदार्थमुक्त, झोपडपट्टीमुक्त व अतिक्रमणमुक्त करून जागतिक दर्जाचे शहर बनवण्यासाठी सरकारने व्यापक कृती आराखडा जाहीर केला आहे. विकासकामांमध्ये पक्षीय राजकारण आणले नाही, लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या प्रश्नांना न्याय देणे ही सरकारची जबाबदारी असून मंजूर आर्थिक तरतुदींना मान्यता देण्यात आली आहे. **-एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकर अपघात

# लाकडी ओंडक्यांच्या खुट्ट्यांमुळे मोठी दुर्घटना टळण्यास मदत

**मंगल हनवते, लोकसत्ता**



**मुंबई :** गेल्या आठवड्यात मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकरचा अपघात झाला आणि महामार्ग तब्बल ३२ तासांसाठी ठप्प झाला. अपघातानंतर गॅस टँकरमधून होणाऱ्या वायू गळतीमुळे स्फोट झाला असता तर देशातील आतापर्यंतची सर्वात मोठी दुर्घटना घडली असती. स्फोटामुळे १० किमीपर्यंतचा परिसर हदरला असता आणि त्यानंतर निर्माण होणारी परिस्थिती आटोक्यात आणणे मोठे आव्हान ठरले असते. पण तज्ज्ञांचे प्रयत्न आणि लाकडी ओंडक्यापासून बनविण्यात आलेल्या खुट्ट्यांमुळे हे सर्व टळले.

लाकडी खुट्ट्या तयार करून टँकरचे व्हाल्व बंद करून वायू गळती रोखल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. ही दुर्घटना कशी टळली, वायू गळती रोखण्याचे आव्हान किती कठीण होते आणि यावेळी नेमक वायू गळती रोखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पथकातील सदस्यांची मनःस्थिती काय होती याचा अनुभव या पथकातील प्रमुख सदस्य सतीश अलोन यांनी 'लोकसत्ता'ला सांगितला.

गुजरातला जाणाऱ्या गॅस टँकरचा ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता बोरघाटातील आडोशी बोगद्याजवळ पुणे वाहिनीवर अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर उलटला आणि वायू गळती सुरू झाली. वायू गळती रोखण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), वाहतूक पोलीस, महामार्ग पोलीस, सेवाभावी संस्था प्रयत्न करत होते. झाडांच्या फांद्या तोडून त्या व्हॉल्वजमध्ये खोचून वायू गळती रोखण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. मात्र त्याला यश येत नसल्याची माहिती हेल्प फाऊंडेशनचे धनंजय गीध यांनी दिली. वायू गळती रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (बीपीसीएल) माहुल रिफायनरीमधील अग्निशमन दलातील उच्चपदस्थ अधिकारी सतीश अलोन यांना आणि त्यांच्या पथकाला बोलावण्यात आले. .

वायू गळती रोखण्यासाठी कोणतीही अत्याधुनिक यंत्रसामग्री नसल्याने लाकडी ओंडक्याच्या खुट्या तयार करून व्हॉल्व बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वाहतूक पोलिसांनी लाडकी ओंडके उपलब्ध करून दिले. त्यांना आकार देण्यासाठी यंत्र उपलब्ध करण्यात आले. झाडांच्या फांद्यांनी व्हॉल्वच्या आकाराचा अंदाज घेऊन ओंडक्यांना आकार देऊन खुंट्या बनविण्यात आल्या आणि पहिली खुंटी पहिल्या व्हॉल्वमध्ये बसवून वायू गळती रोखली. सायंकाळी तिन्ही व्हॉल्व लाकडी खुट्ट्यांनी बंद केले. लाकड्याचा ओंडका आमच्या कामी आला, असे अलोन म्हणाले.

## भुयारी मार्गात टेम्पोच्या धडकेत तरुण ठार

**पुणे :** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे जाणाऱ्या टेम्पोची धडक बसून तरुणाचा मृत्यू झाला. पुण्यातील आंबेगाव बुद्रुकमधील झाशीची राणी लक्ष्मीबाई भुयारी मार्गात ११ फेब्रुवारी रोजी हा अपघात घडला.

इराप्पा मारूती बैलपत्तार (वय ४०) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी अज्ञात टेम्पो चालकाविरूद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

RR SHRAMIK

**राम रत्ना वायर्स लिमिटेड**

(CIN: L31300MH1992PLC067802)

नोंद कार्यालय: राम रत्ना हाऊस, व्हिक्टोरिया मिल कंपाउंड (युटोपिया सिटी), पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३.

दूरध्वनी: +९१-२२-६८२८ ६०००

वेबसाईट: www.rrshramik.com • ईमेल आयडी: investorrelations.rrwl@rrglobal.com

**भौतिक सिक्युरिटीजच्या हस्तांतरण आणि डीमटेरियलायझेशनसाठी विशेष विंडो**

सेबी परिपत्रक दिनांक ३० जानेवारी २०२६ नुसार, ०१ एप्रिल २०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या भौतिक स्वरूपातील प्रतिभूतींच्या हस्तांतरण व डीमॅटेरियलायझेशन ("डिमॅट") साठी **विशेष विंडो** सुरू करण्यात आली आहे. ही विंडो **४ फेब्रुवारी २०२७** पर्यंत खुली राहील आणि खालील प्रकरणांमध्ये लागू असेल:

1. ज्या प्रकरणांमध्ये ०१ एप्रिल २०१९ पूर्वी मूळ शेअर हस्तांतरण विनंती दाखल करण्यात आलेली नाही आणि भागधारकाकडे मूळ शेअर प्रमाणपत्र उपलब्ध आहे;
2. ज्या प्रकरणांमध्ये ०१ एप्रिल २०१९ पूर्वी मूळ शेअर हस्तांतरण विनंती दाखल करण्यात आली होती, परंतु कागदपत्रे/प्रक्रियेमधील त्रुटी किंवा इतर कारणांमुळे ती नाकारण्यात आली/ परत करण्यात आली/ प्रलंबित ठेवण्यात आली.

त्याअनुषंगाने, पात्र भागधारकांना आवश्यक कागदपत्रांसह पुन्हा अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अर्ज कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, म्हणजेच डेटामॅटिक्स बिझनेस सोल्युशन्स लिमिटेड, प्लॉट क्रमांक ए १६ आणि १७, पार्ट बी क्रॉस लेन, एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ येथे किंवा investorsqry@datamaticsbpm.com या ई-मेलवर पाठवावेत.

कृपया नोंद घ्यावी की संबंधित शेअर्स केवळ डिमॅट स्वरूपातच हस्तांतरित धारकाच्या खात्यात अनिवार्यपणे जमा केले जातील आणि **हस्तांतरण नोंदणीच्या तारखेपासून एक वर्ष कालावधीसाठी लॉक-इन अंतर्गत राहतील.** सदर लॉक-इन कालावधीत हे प्रतिभूती हस्तांतरित/ गहाण/ तारण ठेवता येणार नाहीत.

**राम रत्ना वायर्स लिमिटेड**
स्वाक्षरी
सौरभ गुप्ता
एजीएम - कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांकित: १२ फेब्रुवारी २०२६

# न्यायालय, न्यायमूर्तींच्या निवासस्थानाच्या सुरक्षेची माहिती द्या

## उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**


**मुंबई :** न्यायिक अधिकारी आणि वकिलांच्या सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व न्यायालयीन परिसर तसेच न्यायमूर्ती आणि त्यांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेबाबतच्या उपाययोजनांची सविस्तर माहिती सादर करा, असे आदेश उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला दिले.

धनबाद येथे अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या हत्येनंतर न्यायाधीश आणि वकिलांना कसलीही भीती न बाळगता न्यायालयीन कामकाज करता यावे, यासाठी न्यायाधीश किंवा वकिलांना सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी त्या त्या राज्याची असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने ३० जुलै २०२१ मध्ये स्वतःहून (सुओमोटो) घेतलेल्या प्रकरणात नमूद केले होते. औरंगाबाद खंडपीठानेही १० फेब्रुवारी रोजी यासंदर्भात सुओमोटो याचिका दाखल केली होती. आता मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणी स्वतःहून याचिका दाखल करून घेतली. तसेच पोलीस विभागाने न्यायाधीश आणि त्यांच्या निवासस्थानाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याबाबतची माहिती सादर करण्याचे आदेश दिले.

### 'लेखापरीक्षणाचा अहवाल सादर करा'



खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना मुंबई उच्च न्यायालय परिसर, न्यायमूर्तींची निवासस्थाने, गोवा, औरंगाबाद व नागपूर येथील खंडपीठे, कोल्हापूर येथील सर्किट बेंच तसेच राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयांतील सुरक्षेच्या लेखापरीक्षणाचा अहवाल सादर करण्याचे आदेश देऊन १७ फेब्रुवारी रोजी प्रकरणाची सुनावणी ठेवली.



# शिवरायांच्या १२ किल्ल्यांना 'युनेस्को'कडून जागतिक वारसा प्रमाणपत्र

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशीष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले.

दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर ११ जुलै २०२५ रोजी, युनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले होते. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.

युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास ॲड. शेलार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## कोकणातील कातळशिल्पांच्या संशोधनासाठी १४ कोटी

**मुंबई :** कोकणात १७५ गावांत दोन हजारांहून अधिक कातळशिल्पे आहेत. या कातळशिल्पांचे गूढ शोधून काढण्यासाठी यावर आता संशोधन केले जाणार असून यासाठी राज्य सरकारने १४ कोटी ६२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या संशोधनासाठी मुंबई आणि रत्नागिरी येथील जागतिक वारसा कक्ष निर्माण केला जाणार आहे. या वारसा कक्षाच्या माध्यमातून कोकणातील कातळशिल्पाविषयीचे संशोधन, नवीन स्थळांचा शोध आणि कातळशिल्पांचे दस्तऐवजीकरण करण्यात येणार आहे.

कोकणात समुद्रकिनाऱ्यालगत ३०० किलोमीटर अंतरावर विविध ठिकाणी कातळशिल्पे आढळतात. यापैती बारसू येथील कातळशिल्प समूह क्र. २, चवे, देवीहसोळ आणि कशेळी ही कातळशिल्पे राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आली आहे. आता या कातळशिल्पांच्या माध्यमातून आद्य ऐतिहासिक मानव आणि त्या वेळचा काळ याचा अभ्यास केला जाणार आहे.

केनरा बैंक Canara Bank (A Government of India Undertaking) सिंडिकेट Syndicate

BOBCAPS TRUST | INNOVATION | EXCELLENCE (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR ASSIGNMENT OF OUTSTANDING FUND BASED DEBT OF M/S GAMMON INDIA LIMITED ("GIL")**

BOB Capital Markets Limited (**"BOBCAPS"** or **"Process Advisor"**) has been mandated by Canara Bank (**"Bank"** or **"Lender"**) for assisting and advising the Lender on the bid process and matters incidental thereto in connection with the assignment of Fund Based debt/ financial assets arising out of such Fund Based debts of GIL through Swiss Challenge Method to the Permitted Transferees and ARCs in accordance with the regulatory guidelines issued by Reserve Bank of India **("RBI")**, including the RBI (Commercial Banks - Transfer and Distribution of Credit Risk) Directions, 2025 (the **"RBI Directions"**) and as amended time to time.

BOBCAPS, on behalf of the Lender invites Expressions of Interest **("EOI")** from the Permitted Transferees and ARCs under the RBI Directions, to acquire the Fund Based debt/ financial assets arising out of such **Fund Based** debt of GIL along with underlying security through assignment. The Lender is proposing to undertake a Swiss Challenge Method on **"All Cash"** basis. Transfer of Fund Based debt with underlying assets via assignment shall be on **"As is where is", "As is what is", "As is how is", "Whatever there is"** and **"Without recourse"** basis, without any representation, warranty or indemnity by the Lender, based on existing offer in hand (**"Anchor Bid"**). Considering that the auction is under the **"Swiss Challenge Method"** on the Anchor Bid, the Anchor Bidder shall have specific preferential rights as set out in the Bid Process Document and further have the right to match the highest bid under Right of First Refusal (**"ROFR"**).

The details of the Swiss Challenge Method are as under:

| | |
|---|---|
| Principal Outstanding Fund Based Debt | Rs. 620.79 Crore |
| Refundable Participation Fee (RPF) | Rs. 2.00 Crore (Rupees Two-Crore Only) |
| Last date for submission of EOI and RPF | February 18, 2026 |
| Last Date for access to VDR and Due Diligence | March 04, 2026 by 5:00 PM |
| Date of E-auction | March 09, 2026 |
| Offer in hand / Anchor Bid | Rs. 75.00 Crore (All Cash Basis) |
| Minimum Markup @ ~5.33% of Anchor Bid | Rs. 4.00 Crore |
| Bidding Start Price | Rs. 79.00 Crore |
| Incremental Amount (Bid Multi-plier) | Rs. 1.00 Crore |

The sale will be conducted as per the terms & conditions and procedure set out in the Bid Process Document (BPD) which is uploaded on the websites www.canarabank.bank.in & www.bobcaps.in/tenders.

The format of EOI & necessary documents are available in the BPD uploaded on the Bank's website (www.canarabank.bank.in) and Process Advisor's website (www.bobcaps.in/tenders) Interested bidders should submit the necessary documents electronically vide email to cb15550@canarabank.com and gil.scm@bobcaps.in and/or physically at "Assistant Vice President, BOB Capital Markets Limited, B-1704, Parinee Crescenzo, G Block, BKC, Bandra (East), Mumbai 400051". The deadline for submission of same is February 18, 2026.

Upon submission of necessary documents and evaluation of the same, the bidders would be allowed access to the virtual data room (**"VDR"**) having the information pertaining to the account of GIL for due diligence until March 04, 2026 by 5:00 PM. The timelines for the due diligence, terms of Anchor Bid etc., are provided in the Bid Process Document.

Any of the terms & conditions of the EOI & BPD may be amended or changed or the entire bidding process may be terminated at any stage by the Lender or BOBCAPS at the instructions of the Lender, without assigning any reasons. All key information in relation to the bidding process will be available on the Bank's website and the Process Advisor's website under **"Tenders"** tab. Bid applicants must, at all times, keep themselves apprised of the latest updates/ clarifications/ amendments/ time extensions, if any, (including the process documents) in this regard as uploaded on the Bank's and the Process Advisor's website. BOBCAPS or Lender shall not be held liable for any failure on part of the bidders to keep themselves updated of such modifications. The Lender will not assume any Operational, Legal or any other type of risk relating to the loan exposure.

For any clarifications, please contact the following:

| Contact Person | Phone No. | Email-ID |
|---|---|---|
| Mr. Rakesh Chandra Shandilya (Canara Bank) | +91 6364917101 | cb15550@canarabank.com |
| Mr. Sagar Bhadra (BOBCAPS) | +91 7666412395 | gil.scm@bobcaps.in |
| Mr. Wasim Shaikh (BOBCAPS) | +91 8976771242 | |

Note: Please note that the process envisaged in this advertisement shall be subject to final approval by the competent authorities of the Lender. This is not an offer document and nothing contained herein shall constitute a binding offer or a commitment to assign any debt. The decision of the Lender in this regard shall be final and binding.

Applicants/Acquirer shall be under their own obligation to follow all applicable laws pertaining to transfer of stressed loan exposure/NPAs. The bidding and sale process envisaged in this advertisement shall be conducted in accordance with and shall be subject to the terms of the BPD.

**Date : February 13, 2026**
**Place : Mumbai**

**Sd/-**
**Authorized Signatory, Canara Bank**

# 'मांडवी'ला विलंब; प्रवाशांचे हाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून कोकणातील रेल्वेगाड्यांना प्रचंड उशीर होत असल्याने प्रवाशांना विलंबयातना सहन कराव्या लागत आहेत. त्यातच मांडवी एक्स्प्रेस सुटण्यास गुरुवारी तीन तास विलंब झाल्याने दादरसह इतर रेल्वेस्थानकांत प्रवाशांची गर्दी झाली होती. सीएसएमटीवरून सकाळी ७.१० वाजता सुटणारी ही गाडी ९.४५ वाजता सुटली.



त्यातच ही गाडी सकाळी ९.४९ वाजता मशीद रेल्वे स्थानकादरम्यान पोहोचली असता, कोणी तरी आपत्कालीन साखळी ओढल्याने गाडी ११ मिनिटे तेथेच थांबली. त्यानंतर दादर स्थानकात रेल्वेगाडी सुमारे अडीच तास विलंबाने अर्थात १०.०९ वाजता पोहोचली. परिणामी, शेकडो प्रवाशांचे हाल झाले. ही गाडी रत्नागिरी स्थानकापुढे तीन तास विलंबाने धावत होती.

### तेजस एक्स्प्रेसला १० तास उशीर

मुंबई - मडगावदरम्यानची तेजस एक्स्प्रेस अतिजलद रेल्वेगाडीही सध्या कूर्मगतीने धावते आहे. ही गाडी मडगावहून बुधवारी जवळपास पावणे अकरा तास विलंबाने धावली. तर त्याच दिवशी तिला मुंबईहून सुटण्यासाठी ६.१९ तास उशीर झाला होता. गेल्या अनेक दिवसांपासून या गाडीचे वेळापत्रक बिघडले असून प्रशासनाने त्यावर ठोस उपाययोजना न केल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तेजस एक्स्प्रेसच्या वेळेत वंदे भारत एक्स्प्रेस चालवण्यात येण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

protean

**प्रोटीयन ईगव टेक्नोलॉजीज लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** १ ला मजला, टाइम्स टॉवर, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई – ४०० ०१३

**सीआईएन :** L72900MH1995PLC095642 | **फोन:** +९१ २२ ४०९० ४२४२ | **ई-मेल :** cs@proteantech.in | **संकेत स्थळ :** www.proteantech.in

**३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महीन्याच्या कालावधी करिता अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. कोटी मध्ये इपीएस वगळता)

| अनु. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | | | एकत्रित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही | | | संपलेले ९ महीने | | संपलेले वर्ष | संपलेली तिमाही | | | संपलेले ९ महीने | | संपलेले वर्ष |
| | | ३१.१२.२०२५ अलेखापरिक्षित | ३०.०९.२०२५ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२४ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२५ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२४ अलेखापरिक्षित | ३१.०३.२०२५ लेखापरिक्षित | ३१.१२.२०२५ अलेखापरिक्षित | ३०.०९.२०२५ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२४ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२५ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२४ अलेखापरिक्षित | ३१.०३.२०२५ लेखापरिक्षित |
| १ | परिचलनातून एकूण उत्पन्न | २४२.९० | २६४.१८ | २१८.३५ | ७४५.६७ | ६६९.०० | ९०७.९७ | २४३.२९ | २६५.१० | २२१.१२ | ७४७.७५ | ६७०.१९ | ९०८.८८ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर पूर्वी अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी) | ३२.६६ | ३४.६३ | २६.५२ | १०२.३१ | ९४.२९ | १२०.१८ | ३३.३७ | ३२.०४ | २८.५२ | ९७.७८ | ९३.१९ | ११८.४३ |
| ३ | कर पूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी पश्च्यात) | २८.७१ | ३४.६३ | २६.५२ | ९८.३६ | ९४.२९ | १२०.१८ | २९.४२ | ३२.०४ | २८.५२ | ९३.८३ | ९३.१९ | ११८.४३ |
| ४ | कर पश्च्यात च्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी पश्चात) | २१.६६ | २६.२० | २०.९३ | ७४.३६ | ७३.१६ | ९४.२१ | २२.५० | २३.८६ | २२.९३ | ७०.२१ | ७२.०६ | ९२.४६ |
| ५ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [सर्वसमावेशक नफा/ (तोटा) (करपशच्यात) कालावधीसाठी आणि इतर सर्वसमावेशक उत्पन (करपशच्यात)] | २१.६६ | २६.२० | २०.९३ | ७४.३७ | ७४.९४ | ९२.८३ | २२.५० | २३.८६ | २२.९३ | ७०.२२ | ७३.८४ | ९१.०८ |
| ६ | भरणा केलेले समभाग भांडवल (रु. १०/ दर्शनी मुल्य असलेले प्रति समभाग) | ४०.६२ | ४०.६१ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.५५ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.६१ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.५५ | ४०.५५ |
| ७ | राखीव (पुनर्मुल्यांकन राखीव वगळून) | – | – | – | – | – | ९६४.०७ | – | – | – | – | – | ९५८.२३ |
| ८ | प्रति समभाग प्राप्ती (असाधारण बाबी पश्चात) (प्रत्येकी रु. १०/-)(संपलेले वर्ष वगळता वार्षिकृत नाही) | | | | | | | | | | | | |
| | मूलभूत : | ५.३४ | ६.४६ | ५.१७ | १८.३३ | १८.०७ | २३.२६ | ५.५५ | ५.८८ | ५.६६ | १७.३० | १७.८० | २.८३ |
| | सौम्यिकृत: | ५.३१ | ६.४२ | ५.१२ | १८.२३ | १७.८९ | २३.०७ | ५.५२ | ५.८५ | ५.६१ | १७.२१ | १७.६२ | २२.६५ |

टिप :

१) वरील विवरण हे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वयरमेंटस) रेग्युलेशन, २०१५च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंज कडे दाखल करण्यात आलेल्या डिसेंबर ३१, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महीन्याच्या कालावधी करीताचा वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. तिमाही आणि नऊ महीन्याच्या कालावधी करीताचा वित्तीय निष्कर्षाची संपूर्ण प्रारुप बीएसई ची वेबसाईटस www.bseindia.com, एनएसई ची वेबसाईटस www.nseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.proteantech.in वरही उपलब्ध आहे.

२) डिसेंबर ३१, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महीन्याच्या कालावधी करीताचा उक्त वित्तीय निष्कर्षाचे लेखापरीक्षण समितीने आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या फेब्रुवारी ११, २०२६ रोजी झालेल्या सभेत त्यांना मंजूरी देण्यात आली आहे.

३) नोव्हेंबर २१, २०२५ रोजी, भारत सरकारने चार नवीन कामगार संहिता अधिसूचित केल्या आहेत, ज्यामध्ये २९विद्यमान कामगार कायदे समाविष्ट आहेत. या नियामक बदलांमुळे उद्भवणाऱ्या आर्थिक परिणामाचे मूल्यांकन सुलभ करण्यासाठी कामगार आणि रोजगार मंत्रालयाने ३० डिसेंबर २०२५ रोजी केंद्रीय नियम आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) मसुदा प्रकाशित केला आहे. या परिणामाची भौतिकता आणि नियामक-चालित, पुनरावृत्ती न होणारे स्वरूप लक्षात घेता, कंपनीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाच्या विवरणपत्रात 'अपवादात्मक बाबी' अंतर्गत 'नवीन कामगार संहितांचा वैधानिक प्रभाव' असा वाढीव प्रभाव सादर केला आहे. वेतनाच्या व्याख्येत झालेल्या बदलामुळे प्रामुख्याने रु.३.७७ कोटी रुपयांचे उपदान (ग्रॅच्युइटी) आणि रु.०.१८ कोटी रुपयांच्या मोबदल्यात रजा (कॉम्पेन्सेटेड ॲब्सन्सेस) यांचा अतिरिक्त प्रभाव पडला आहे. नवीन कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीशी संबंधित घडामोडींवर कंपनी सतत लक्ष ठेवून आहे आणि चालू आधारावर आपल्या अंदाजांचा आढावा घेत राहील.

स्थळ : मुंबई
दिनांक : फेब्रुवारी ११, २०२६

प्रोटीयन ईगव टेक्नोलॉजीज लिमिटेड च्या वतीने आणि करिता
सही/-
सुरेश सेठी
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
डिआयएन : ०६४२६०४०